'अ'

अव्वल मुकदम्यात हुकूमनामा
ऑ. २० कानु. ६, ७, फॉर्म नं. १
पुरवणी ह, परिशिष्ट १

दिवाणी अ ३७ म

## हुकूमनामा

## देवगड येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयात

**रे.दि.मु.नं. ०८/२०२१**
**नि.ता.२३/०६/२०२६**
**निशाणी क्रमांक – ५२**

**श्री. गणपत शंकर घाडी (म.वा.)**
**१. श्रीमती. सरस्वती गणपत घाडी (मयत नाव कमी)**
व.सु.६५ धंदा- काही नाही

**२. श्री. अंकुश गणपत घाडीगांवकर**
व.सु ४५, धंदा- शेती व नोकरी

**३. श्री विनायक गणपत घाडीगांवकर**
व.सु.४२, धंदा- शेती व नोकरी

**४. श्री अरविंद गणपत घाडीगांकर**
व.सु.३६, धंदा- शेती
सर्व रा. मु. पो. तिर्लोट भाकरवाडी
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

**५. सौ. सुविधा सुधाकर पुजारे**
व.सु. ४३ धंदा- गृहिणी
रा.मु.पो. बापर्डे काळेश्वरवाडी
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

**वादी**

**वि.**

**१. ऋषी उर्फ पुनाजी सखाराम घाडी (म.वा.) .**
**१अ. श्रीमती. अनिता पुनाजी घाडी**
व.सु.६० धंदा- काही नाही

**१ब. श्री. राकेश पुनाजी घाडी**
व.सु ३७, धंदा- शेती

**प्रतिवादी**

**१क. श्री अमित पुनाजी घाडी**
व.सु.३५, धंदा- शेती
सर्व रा.मु.गोवळ गावठण, पो. पाटगांव
ता. देवगड जि. सिंधुदूर्ग

**२. श्री. सुर्याजी सखाराम घाडी**
व.सु. ६५, धंदा- शेती

**३. श्री. राजाराम सखाराम घाडी**
व.सु.५८, धंदा- शेती

**४. श्री. संतोष भानू घाडी**
व.सु.५० धंदा- शेती
रा.नं. २ ते ४ मु. पो. तिर्लोट गाववाडी
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

**५. श्री. रविंद्र नामदेव घाडी**
व.सु. ३२, धंदा- शेती

**६. श्री. रामचंद्र शंकर घाडीगांवकर**
व.सु. ४८, धंदा- शेती

**७. श्री. श्रीपत शंकर घाडी**
व.सु. ७१, धंदा- शेती
रा. नं.५ ते ७ मु. पो. तिर्लोट भाकरवाडी
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग

} **प्रतिवादी**

**आदेशीका शुल्क वगैरे करीता दावा रु. १०००/-**

**वादीचा दावा असा की,**

**१.** जिल्हा व रजिस्ट्रेशन तुकडी सिंधुदुर्ग, तालुका व तालुका पंचायत देवगड पैकी गाव व ग्रामपंचायत तिर्लोट येथिल मिळकत तपशिल-

| अ.नं. | स. नं. | हि.नं. | क्षेत्र<br>हे.आर.पॉ | आकार<br>रू. पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ४३ | १/४ | ०.०२.०० | ०.०२ |
| २ | ४३ | १/८ | ०.०८.००<br>०.०२.०० | ०.०५ |

येणे प्रमाणे मिळकती व त्यात असलेल्या झाड झाडो-यासह तदंगभुत मिळकती हा या दाव्याचा विषय आहे.

**२.** दावा मिळकती या वादी व प्र.वादी नं. ५ ते ७ यांच्या वडिलार्जीत कुळपणाच्या तसेच मालकी व कुळवहिवाटीच्या मिळकती होत्या व आहेत सदर मिळकती वादी कुटूंबीयांना कुळ कायदयाच्या तरतुदी नुसार विक्री होवून, वादी कुटूंबीय सदर मिळकतीचे मालक झाले आहेत. वादी व प्र.वादी नं.५ ते ७ यांच्या दरम्याने नि.दि.मु.नं. २३/२०१५ चा दावा वाटपासाठी दाखल होवून त्याप्रमाणे दावा मिळकतीचे वादी व प्र.वादी नं.५ ते ७ दरम्याने वाटप होवून त्यांच्या वहिवाटी त्यात चालू आहेत.

**३.** दावा मिळकतीमधे प्र.वादी नं. १ ते ४ यांचा कोणत्याही स्वरूपात हक्क संबंध नव्हता व नाही. दावा मिळकती जवळ प्र.वादी नं.१ ते ४ यांच्या वहिवाटीची जमीन आहे. त्यामुळे प्र.वादी नं.१ ते ४ हे वहिवाटीवरून नाहक वाद घालत असतात. दावा मिळकती या, "आपल्या मालकीच्या असून त्यात आपण वहिवाट करणार" अशी ते वादी कुटूंबास धमकी देत असतात. मात्र वादीने त्यांना आतापर्यंत ठामपणे विरोध केल्याने, त्यांचा दावा मिळकत बळकावण्याचा प्रयत्न असफल ठरला आहे. मात्र वादी हे आता वयोवृदध झाले असून, वयोमानाप्रमाणे ते आजारी असतात, त्यामुळे प्र.वादी नं.१ ते ४

हे फारच शेफारून गेले असून ते वादीस वहिवाटीवरून धमकी देत असतात. वादीचे बंधू मुंबई येथे नोकरीस असतात. त्यामुळे त्यांची वादीस प्रत्यक्ष जागेवर प्र.वादी नं.१ ते ४ यांना विरोध करण्यास फारशी मदत होत नाही. प्र.वादी नं.५ हे वादीचे मयत बंधु नामदेव यांचे मुलगे आहेत. वादी हे माहे जानेवारी २०२१ मध्ये आपल्या दावा मिळकतीत शेतीपुर्व मशागतीसाठी गेले असता, प्र. वादी नं.१ ते ४ हे त्याठिकाणी आले व त्यांनी वादीस, "पुन्हा दावा मिळकतीत आलात तर तुमची तंगडी तोडून टाकू" अशी धमकी दिली. वादी हे एकटे असल्याने त्यांनी प्र.वादी नं.१ ते ४ यांना कोणताही प्रतिकार केलेला नाही. प्र.वादी नं.१ ते ४ यांचा मोठा जमाव असून त्यांचेकडे आर्थिक पाठबळही आहे. त्यामुळे भविष्यात ते आपल्या आर्थिक पाठबळाच्या व मनुष्य बळाच्या जोरावर दावा मिळकत बळकावतील अशी वादीस साधार भिती वाटते. सबब प्र.वादी नं.१ ते ४ यांनी वादी व प्र.वादी नं.५ ते ७यांच्या दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत करू नये अथवा करवू नये अशी त्यांच्या विरूध्द कायमची ताकिद होण्यासाठी सदरील दावा आहे.

**४.** प्र.वादीं नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीत कब्जा केल्यास व तसे दिसून आल्यास, अगर चौकशी अंती कब्जा देणे आवश्यक आहे असे दिसून आल्यास तोही कब्जा याकामी वादीस देण्यात यावा. अशी वादीची केवळ वैकल्पिक मागणी आहे.

**५.** प्र.वादी नं.५ ते ७ हे वादीचे सह–हिस्सेदार आहेत. मात्र ते आजरोजी दाव्यावर सही करण्यास येवू न शकल्यामुळे त्यांना प्र. वादी म्हणून सामील केले आहे.

**६. दाव्यास कारण** –वादी हे माहे जानेवारी २०२१ मध्ये आपल्या दावा मिळकतीत शेतीपुर्व मशागतीसाठी गेले असता, प्र.वादी नं.१ ते ४ हे त्याठिकाणी आले व त्यांनी वादीस, "पुन्हा दावा मिळकतीत आलात तर तुमची तंगडी तोडून टाकू" अशी धमकी दिली. वादी हे एकटे असल्याने त्यांनी प्र.वादी नं. १ ते ४ यांना कोणताही

प्रतिकार केलेला नाही. प्र.वादी नं.१ ते ४ यांचा मोठा जमाव असून त्यांचेकडे आर्थिक पाठबळही आहे. त्यामुळे भविष्यात ते आपल्या आर्थिक पाठबळाच्या व मनुष्य बळाच्या जोरावर दावा मिळकत बळकावतील अशी वादीस साधार भिती वाटते. त्यावेळी व तद्नंतर वेळोवेळी मे. न्यायालयाचे स्थल सिमेत घडले असून सदरील दावा या न्यायालयास चालविण्याचा अधिकार आहे.

**७. दाव्याची आकारणी** सदरील दावा ताकीदीसाठी असल्याने त्याचा आकार रु. १०००/– करुन त्यावर रु. २००/– चा न्यायीक मुद्रांक दिला आहे.

येणेप्रमाणे आकार हा वकील फी, बजावणी खर्च, न्यायालयीन अधिकार क्षेत्र इत्यादीसाठी केला आहे.

सदरील वाद विषयाबाबत वादींनी कोणत्याही न्यायालयात दाद मागितलेली नाही.

**८. वादीची विनंती अशी की,**

अ– प्र.वादी नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीतील वादी व प्र.वादी नं.५ ते ७ यांच्या वहिवाटीस हरकत करू नये अथवा करवू नये अशी त्यांस कायमची ताकिद देण्यात यावी.

ब– प्र.वादीं नं.१ ते ४ यांनी दावा मिळकतीत कब्जा केल्यास व तसे दिसून आल्यास, अगर चौकशी अंती कब्जा देणे आवश्यक आहे असे दिसून आल्यास तोही कब्जा याकामी वादीस देण्यात यावा. अशी वादीची केवळ वैकल्पिक मागणी आहे.

क– दाव्याचा खर्च तक्रारी प्र.वादींकडून वसुल होवून मिळावा.

ड– अन्य आवश्यक त्या सर्व दादी देववाव्यात.

येणे प्रमाणे दावा आहे.

आज दिनांक २३ माहे जून सन २०२६ रोजी श्री. श्रीकांत एस. पचंडी, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), देवगड, तालुका देवगड, जि.सिंधुदुर्ग यांचे समोर, वादी हजर तर्फे वकील श्री. ए.एम.माणगांवकर हजर, सबब त्यांचे समक्ष, प्रतिवादी क्र.४ हजर तर्फे वकील श्री. एम.एस.काळे हजर, सबब त्यांचे समक्ष, अखेर निकालासाठी झालेल्या आदेशान्वये हुकूमनामा निघालेवरुन असा आदेश करणेत आला आहे की,

**ORDER**

1. Suit is Decreed.
2. Defendant No.1A to 1C,2,3 and 4 are permanently prohibited from obstructing possession of the Plaintiff over the suit property otherwise than following due course of law.
3. Parties to bear their own costs.
4. Decree be drawn up accordingly.

## मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवगड यांचे न्यायालयात
## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ०८/२०२१ निकाल तारीख -२३/०६/२०२६
## निशाणी क्रमांक ५२ लगत
## खर्चाचा आकडा

| अ.क्र. | वादी यांना झालेला खर्च | | पैसे | अ.क्र | प्रतिवादी क्र.४ ला झालेला खर्च | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिर्याद अर्जास स्टॅम्प – नि.१ | २०० | ०० | १ | वजावटीला किंवा विरुद्ध दाव्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प – नि.२,२२ रु.१०/- प्रमाणे | २० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प -नि.१४ रु.१०/- प्रमाणे | १० | ०० |
| ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.६ ते ८, २१,३४ प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | २५ | ०० | ३ | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प – नि.२७,४८ प्रत्येकी रु. ५/- प्रमाणे | १० | ०० |
| ४ | भत्ता- | ०० | ०० | ४ | भत्ता - | ०० | ०० |
| ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी - दावा रक्कम रु.१,०००/- | १५० | ०० | ५ | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी प्रतिदाव्यावरील प्लीडरची फी | १५० | ०० |
| ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० | ६ | प्रोसेस लागू करणे | ०० | ०० |
| ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज - नि.२९,३०,४९ रु. १०/- प्रमाणे | ३० | ०० | ७ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज - नि.१६,१७ रु. १०/- प्रमाणे | २० | ०० |
| ८ | इतर अर्ज – नि.५ रु. १०/- प्रमाणे नि.१८,१९,३१,३२,३५,३८,४०,४२ रु. ५/- प्रमाणे | ५० | ०० | ८ | इतर अर्ज – नि.२५,४५ रु. ५/- प्रमाणे | १० | ०० |
| | **एकूण** | **४७५** | **००** | | **एकूण** | **२००** | **००** |
| | **न दिलेला खर्च** | | | | **न दिलेला खर्च** | | |
| १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० | १ | न्यायालयीन शुल्क परतावा | ०० | ०० |
| २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प नि.२ | १० | ०० | २ | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प | ०० | ०० |
| ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज - नि.२९,३०,४९ रु. १०/- प्रमाणे | ३० | ०० | ३ | तहकुबीबद्दल दिलेले अर्ज - नि.१६,१७ रु. १०/- प्रमाणे | २० | ०० |
| ४ | इतर अर्ज – नि.---- | ०० | ०० | ४ | इतर अर्ज – नि.---- | ०० | ०० |
| | **एकुण** | **४०** | **००** | | **एकुण** | **२०** | **००** |
| | **बाकी** | **४३५** | **००** | | **बाकी** | **१८०** | **००** |
| | **पूर्णांकात** | **४३५** | **००** | | **पूर्णांकात** | **१८०** | **००** |

**आज तारीख २३ माहे जून सन २०२६ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

तयार करणार
(ए.एस.कुळकर्णी)
क.लिपीक

तपासले बरोबर आहे
(आर.ई.मणचेकर)
व.लिपीक

**(श्रीकांत एस.पचंडी)**
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),**
**देवगड**

CIVIL JUDGE J. D, Deogad

वादींतर्फे वकील - श्री.ए .एम.माणगांवकर

प्रतिवादी क्र.४तर्फे वकील - श्री.एम.एस.काळे
प्रतिवादी क्र.१अ,१ब,१क,२,३,५ते७ - एकतर्फा

(ह्या मुकदम्यातील पक्षकाराना अशी ताकीद देणेत येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपिलाचा निकाल झाल्यावर रेकॉर्ड नाश करणेच्या प्रचलित नियमास अनुसरुन नाश करुन टाकण्यास पात्र होतील.)